ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख १६ जून, १९५४ | अंक १३

## विविध माहिती

**पं. नेहरूंचें तैलचित्र**—चालू वर्षाच्या प्रारंभीं जिरासिमॉव्ह हा रशिअन चित्रकार भारत आणि इजिप्त ह्या दोन देशांचें पर्यटन करून गेला. त्यानें आपल्या पर्यटनांत काढलेल्या ८० तैलचित्रांचें प्रदर्शन नुकतेंच मॉस्को येथें खुलें करण्यांत आलें होतें. ह्या तैलचित्रांत पं. नेहरूंचेंहि एक तैलचित्र आहे.

**भारतांत ३४ परकीय तज्ज्ञ**—मार्च, १९५४ अखेर संपलेल्या वर्षांत ३४ परदेशीय तज्ज्ञांनीं भारत सरकार अगर राज्य सरकारें ह्यांना उद्योगधंद्यांविषयीं सल्ला दिला. ह्या तज्ज्ञांत ब्रिटिश, अमेरिकन, स्वीडिश, जपानी, कॅनेडिअन, फ्रेंच, ऑस्ट्रेलिअन आणि फिनिश तज्ज्ञ होते. पिंपरी येथील पेनिसिलिनचा कारखाना, दिल्ली येथील डी. डी. टी. चा कारखाना व कागदाचा कारखाना, इत्यादी धंद्यांबाबत सल्ला घेण्यांत आला.

**पुस्तकांच्या वहातुकीला सवलत**—इंटरनॅशनल एअर ट्रॅन्सपोर्ट असोसिएशन ह्या संस्थेनें युरोपीय भागांत जीं पुस्तकें पाठविलीं जातील त्यांच्या वहातुकीचे दर ५० टक्क्यांनीं कमी केले आहेत, असें समजतें. ह्या संस्थेंत निरनिराळ्या ४० देशांच्या विमान-वहातूक कंपन्या संघटित झाल्या आहेत. शिक्षणासंबंधींच्या साधनांचा प्रसार विनासायास व्हावा म्हणून युनेस्कोतर्फे दर कमी करण्याची विनंति गेल्या ऑगस्टमध्यें करण्यांत आली होती.

**प्रवाशांना आकर्षित करण्याचा प्रयत्न**—जगप्रसिद्ध होटेल मॉंटे कार्लोच्या व्यवस्थापकांनीं प्रवाशांच्या सुखसोयींसाठीं २,५०,००० पौंड खर्च करण्याचें ठरविलें आहे. होटेलच्या जुगाराच्या दालनांत सुखकर हवामान राखण्याची व्यवस्था करण्यांत येत आहे. युद्धोत्तर जगांत लक्षाधीशांची संख्या कमी झाल्यानें व्यवस्थापकांना उत्पन्नाची तूट भरून काढण्यासाठीं हा मार्ग अवलंबावा लागत आहे.

**तंबाखूच्या व्यापारवृद्धीचे प्रयत्न**-तंबाखूचा व्यापार वाढविणें कितपत शक्य आहे तें अजमावण्यासाठीं भारतीय प्रतिनिधींचें एक मंडळ जपान, सयाम, इंडोनेशिआ, चीन व हॉंगकॉंग ह्या देशांचा दौरा करणार आहे. प्रतिनिधीमंडळाचें नेतृत्व लोकसभेचे सभासद श्री. के. रघुरामय्या ह्यांचेकडे राहणार आहे.

**लखनौच्या पदार्थसंग्रहालयांत उल्का**—ता. १७ एप्रिल रोजीं बनारस येथें एक उल्कापात झाला. त्या उल्कापाताचा दगड लखनौ येथील वस्तुसंग्रहालयांत ठेवण्यांत आला आहे. उल्केचा दगड संग्रहालयांत प्रथमच ठेवण्यांत येत आहे. १९२० व १९४५ सालीं पडलेल्या उल्कांचे प्लॅस्टरचे नमुने मात्र ह्यापूर्वी संग्रहालयांत ठेवण्यांत आले आहेत.

**रशिअन कापडाच्या कारखान्यांत नवीन चात्या**—कापसाचें सूत अधिक जलद गतीनें काढणाऱ्या एका रिंगस्पिंडलचा शोध रशिआंत लावण्यांत आला आहे. ह्या यंत्राच्या साह्यानें पूर्वी तीन चात्यांनीं निघणारें सूत आतां नव्या एकाच चातीनें निघूं शकेल. ह्याशिवाय कापडाच्या कारखान्यांत उपयोगी पडणारीं आणखी कांहीं यंत्रें शोधून काढण्यांत आलीं आहेत. नव्या चात्यांचें उत्पादन मोठ्या प्रमाणावर सुरू झालें आहे.

**१९५२-५३ सालांतील मोटारींचे अपघात**—१९५२-५३ सालीं भारतामध्यें मोटारींचे १६,३७३ अपघात झाले. ह्या अपघातांमुळें १,८४१ माणसें मृत्यू पावलीं आणि १३,५२१ माणसांना जखमा झाल्या.

**प्रा. कोसांबी रशिआला जाणार**—सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ व गणितज्ञ प्रा. डी. डी. कोसांबी ह्यांना सोव्हिएट रशिआच्या ॲकॅडमी सायन्स ह्या संस्थेतर्फे बोलावणें आलें आहे. रशिआंतील शास्त्रीय संस्थांना भेटी देण्याविषयीं त्यांना विनंति करण्यांत आली आहे. भारताच्या प्राचीन संस्कृतीविषयीं ते रशिअन विद्वानांशीं चर्चा करणार आहेत. चालू वर्षअखेर ते रशिआला जातील.

**कृत्रिम तेलाचा कारखाना**—कृत्रिम तेलाच्या उत्पादनाविषयीं भारतीय सरकारला सल्ला देणाऱ्या समितीची बैठक श्रीनगर येथें झाली. भारतांत कृत्रिम तेलाचा कारखाना काढणें शक्य आहे आणि जरूरीचेंहि आहे, असें समितीनें ठरविलें आहे. कृत्रिम तेलाचें उत्पादन करणें भारताला फार खर्चाचें होईल म्हणून ही योजना रद्द करण्यांत आल्याची वार्ता कांहीं दिवसांपूर्वी प्रसिद्ध झाली होती.

**अड्यार येथें कॅन्सर-विषयक संस्था**—वुइमेन्स इंडिअन असोसिएशनतर्फे स्थापण्यांत आलेल्या कॅन्सरविषयक संस्थेच्या अड्यार येथील इमारतीचें उद्घाटन भारताचे अर्थमंत्री श्री. देशमुख ह्यांच्या हस्तें ता. १८ जून रोजीं होणार आहे. संस्थेला मदत म्हणून भारतीय सरकारनें १ लाख रुपये आणि राज्य सरकारनें ५०,००० रुपये दिले आहेत. ५,००० रुपये वर्गणी गोळा करून जमा करण्यांत आले. रुग्णालयांत सध्यां २० रोग्यांची सोय करण्यांत येईल.

**माक्रा कालव्यापासून फायदा**—पंजाबमधील माक्रा कालवा येत्या जुलैपासून कांहीं महिने चालू करण्यांत येणार आहे. कालव्याच्या पाण्यामुळें पंजाबांत १,४७,०२३ टन अधिक धान्य पिकेल असा अंदाज करण्यांत आला आहे. पुढील वर्षी अधिक पाण्याची सोय झाल्यावर २,५८,८९५ टन अधिक धान्य पैदा होईल.

### ब्रिटिश चित्रपट कंपनीला कर्जरूपानें मदत: ब्रिटिश सरकारचा इशारा

अमेरिकेंतील हॉलिवुडच्या चित्रपटांना तोंड देतां यावें म्हणून ब्रिटिश सरकारनें कांहीं वर्षांपूर्वी नॅशनल फिल्म फिनॅन्स कॉर्पोरेशनची स्थापना केली होती. ही संस्था आणि ब्रिटिश लायन फिल्म कंपनी ह्यांच्या दरम्यान सध्या तेढ उत्पन्न झाली आहे. कॉर्पोरेशननें ह्या कंपनीच्या कारभाराविषयींचा एक अहवाल ब्रिटिश बोर्ड ऑफ ट्रेडच्या अध्यक्षांकडे पाठविला आहे. बोर्ड ऑफ ट्रेडचे अध्यक्ष मि. पीटर थॉर्निक्रॉफ्ट हे सध्यां अहवालाचा अभ्यास करीत आहेत. अहवालांत करण्यांत आलेल्या शिफारशींत एक अशी आहे कीं, ब्रिटिश लायन कंपनीला चित्रपटांचें वितरण करण्याचें काम करूं द्यावें; पण निर्मितीचें काम मात्र तिच्याकडून काढून घेण्यांत यावें. कंपनीला कॉर्पोरेशननें ३०,००,००० पौंड रकमेचें कर्ज दिलेलें आहे. कंपनीचा व्यवहार ओंतवट्याचा झाल्यामुळें १०,००,००० पौंडांचें नुकसान अहवालांत दाखविण्यांत आलें असून आणखी तितकेंच नुकसान होईल अशीं चिन्हें दिसत आहेत. उरलेल्या १०,००,००० पौंडांवर नजर ठेवण्यासाठीं एक अधिकारी नेमण्यांत यावा असें कॉर्पोरेशनचें म्हणणें आहे. ब्रिटनचें अभिजात संगीत रजतपटावर आणण्यासाठीं कंपनीनें दोन चित्रपट काढले होते. पण ते सपशेल पडले. सामान्य माणसाच्या मतानें, चित्रपटांतील कथासंगीताच्या जाळ्यांत सांपडल्यानें धवकून राहिली तर संगीताच्या दर्दी लोकांच्या मतानें संगीतापेक्षा कथावस्तूलाच फाजील प्राधान्य देण्यांत आलें. ब्रिटिश लायन कंपनीच्या अधिकाऱ्यांत सर अलेक्झांडर कोर्डासारखे प्रथितयश दिग्दर्शक आहेत, हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तथापि, त्यांच्या स्वतःच्या मालकीची लंडन फिल्म्स ही कंपनी मात्र व्यवस्थित चालू आहे. सरकारनें दिलेल्या आर्थिक मदतीचा कशा पद्धतीनें वापर करावा, हा सगळाच प्रश्न ह्या कंपनीच्या निमित्तानें पुढें आला असल्याचें कळतें.

### तीन प्रमुख हिंदी थिएटरें हॉलिवुड कंपनीच्या हातांत

मुंबई मधील 'न्यू एंपायर,' कलकत्ता येथील 'इलाइट' व दिल्ली येथील 'प्लाझा' हीं सिनेमा थिएटरें ट्वेन्टिएथ सेंचरी-फॉक्स कॉर्पोरेशन (इंडिया) लि. नें २८ मे पासून चालविण्यास घेतलीं आहेत. ह्या हॉलिवुड कंपनीकडे त्या थिएटरांचें नियंत्रण येतीं १० वर्षे राहील. सिनेमा स्कोप व त्यासाठीं जरूर जी साधनसामुग्री ह्यांनीं थिएटरें सुसज्ज केलीं जातील.

### लष्करी इस्पितळांसाठीं नर्सेसची भरती

पुणें, दिल्ली व लखनौ येथील लष्करी इस्पितळांसाठीं शिकाऊ नर्सेसची भरती करण्यांत येणार आहे. उमेदवार मॅट्रिक पास असले पाहिजेत व त्यांचें वय १८ ते ३० वर्षे पाहिजे. अविवाहित, घटस्फोटित, विभक्त रहाणाऱ्या किंवा विधवा ह्यांनाच अर्ज करतां येईल. लष्करी नर्सिंग नोकरींत किमान ५ वर्षे काम करण्याचा करारनामा त्यांना लिहून द्यावा लागेल.

### धारवाड जिल्ह्यांत सहकारी स्पिनिंग मिल

सहकारी तत्त्वावर धारवाड जिल्ह्यांत एक स्पिनिंग मिल काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. मिलमध्यें २०,००० चात्या असतील व तिला भांडवली खर्च ३० लक्ष रु. येईल.

### सरकारी कर्जांची प्रगति

३१ मे, १९५४ अखेर नॅशनल प्लॅन लोनमध्यें ८०.५६ कोटी रु. जमा झाले आहेत.

### वेगवेगळ्या राज्यांतील व्याजाचे कमाल दर

भारतांतील वेगवेगळ्या राज्यांनीं सावकारी नियंत्रणाचे कायदे मंजूर केलेले आहेत. त्या कायद्यांनीं तारणाच्या व बिन तारणाच्या कर्जांवरील व्याजाचे कमाल दर निश्चित केले आहेत. ह्या कायद्यांमुळें सावकारी व्यवहारांवर परिणाम झालेला आहे, पण कर्ज देणाऱ्या दुसऱ्या संस्था त्यांची जागा घेण्यास पुढें आलेल्या नाहींत. श्रॉफ व्यापार व उद्योग ह्यांना कर्जें देतात, त्यांना सावकारी नियंत्रणाची आवश्यकता नाहीं असें श्रॉफ कमिटीचें मत आहे. सावकारीची कार्यपद्धति सुधारण्याचा मार्ग त्यांचेवर कायद्याचीं आणखी बंधनें घालणें हा नसून, कर्ज देणाऱ्या वेगळ्या संस्था निर्माण करणें हा आहे, असें त्या कमिटीनें नमूद केलें आहे.

व्याजाचे कायदेशीर कमाल दर %

| राज्य | तारणावरील | | विना-तारण | |
|---|---|---|---|---|
| | साधें | चक्रवाढ | साधें | चक्रवाढ |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| आसाम | ९ ३/८ | बेकायदा | १२ १/२ | बेकायदा |
| बिहार | ९ | " | १२ | " |
| मुंबई | ९ | — | १२ | — |
| मध्यप्रदेश | १२ | १० | १८ | १० |
| मद्रास २५रु. पर्यंत | ९ ३/८ | — | — | — |
| त्यापुढें | ६ १/४ | | | |
| निधी | ६ ३/४ | | | |
| (डेटर्स प्रो. ॲक्ट) | ९ | चक्रवाढ व्याज घेतलें तर तें साध्या व्याजाच्या कमाल दरानें होणाऱ्या रकमेपेक्षा ज्यास्त होता कामा नये | १५ | रकाना ३ प्रमाणें |
| ओरिसा | ९ | — | १२ | — |
| पंजाब | ७ १/२ | — | १२ १/२ | — |
| उत्तर प्रदेश | १२ | — | २४ | — |
| प. बंगाल | ८ | — | १० | — |
| हैद्राबाद | ६ | बेकायदा | ९ | बेकायदा |
| म्हैसूर | ९ | ६ | १२ | ६ |
| कूर्ग | ७ १/२ | बेकायदा | १२ | बेकायदा |

### दि पूना बँकिंग असोसिएशनचे नवे पदाधिकारी

शनिवार, ता. ५ जून १९५४ रोजीं दि पूना बँकिंग असोसिएशनची वार्षिक सर्वसाधारण सभा होऊन नवीन वर्षासाठीं खालील पदाधिकाऱ्यांची निवड झाली:—

कार्यकारी मंडळ

१. श्री. चिं. वि. जोग, (दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.)
२. श्री. नी. ना. क्षीरसागर (दि भारत इंडस्ट्रियल बँक लि.)
३. श्री. दा. ना. गांडेकर (दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.)

ऑनररी सेक्रेटरी

श्री. दा. ना. गांडेकर (दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.)

ऑनररी ऑडिटर

श्री. वा. ग. आळतेकर (दि पूना सें. को. बँक लि.)

चालू वर्षी ऑक्टोबर महिन्याचे सुरवातीस महाराष्ट्रांतील बँकर्सचें एक स्नेहसंमेलन भरविणें, तसेंच त्या सुमारास बँकिंगविषयासंबंधीं व्याख्यानसप्ताह साजरा करणें, ह्याविषयीं सभेंत विचारविनिमय झाला.

# अर्थ

बुधवार, ता. १६ जून, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकिंग कंपन्यांची तपासणी

बँकांचा आकार व त्यांचें बँकिंग क्षेत्रांतील स्थान ह्यांचा विचार न करतां, सर्वच बँकांची पद्धतशीर तपासणी करण्याचें काम रिझर्व्ह बँकेनें मार्च, १९५० मध्यें सुरू केलें. १९५३ मध्यें १५४ बँका तपासण्यांत आल्या. त्यांपैकीं १४ शेड्यूल्ड बँका होत्या. खालील तक्त्यांत त्यांची तपासणीच्या कारणवार माहिती दिली आहे.

| तपासणीचें कारण | शेड्यूल्ड बँका | बिगर शे. बँका | एकूण |
|---|---|---|---|
| १ लायसेन्स देणें | ३ | ८४ | ८७ |
| २ सर्वसाधारण | ११ | ४७ | ५८ |
| ३ स्कीम ऑफ अरेंजमेंटसाठीं सर्टिफिकेट | — | १ | १ |
| ४ स्कीम ऑफ अमलगमेशनसाठीं मंजुरी | — | — | — |
| ५ दुसऱ्या शेड्यूलमध्यें दाखल | — | २ | २ |
| ६ परिस्थितिसंबंधीं कोर्टास रिपोर्ट | — | ५ | ५ |
| ७ बँका देणीं देण्यास लायक असल्या–नसल्याचें सर्टिफिकेट | — | १ | १ |
| एकूण | १४ | १४० | १५४ |

मार्च १९५० पासून ५१४ तपासण्या पुऱ्या झाल्या आहेत. म्हणजे, शेड्यूल्ड बँका व तक्ते पाठविणाऱ्या बहुतेक सर्व बिगर-शेड्यूल्ड बँका ह्यांची तपासणी झालेली आहे. त्रावणकोर–कोचीन मधील ११२ बँका मात्र त्यांत समाविष्ट नाहींत. तेथील बँकांशीं संबंध राखण्यासाठीं व तपासणीचें काम लवकर संपविण्यासाठीं त्रिवेंद्रम् येथें २ जानेवारी, १९५४ रोजीं बँकिंग ऑपरेशन्सच्या खात्याची एक कचेरी उघडण्यांत आली आहे. आर्थिक परिस्थितीची फेरचौकशी करण्यासाठीं व व्यवहारपद्धति किती सुधारली ह्याची छाननी करण्यासाठीं ११ शेड्यूल्ड व ४२ बिगर–शेड्यूल्ड बँकांची पुनः तपासणी करण्यांत आली. ह्या तपासण्यामुळें रिझर्व्ह बँकेला बँकांच्या कारभाराचा जवळून परिचय होऊं शकतो. १९५३ अखेर २० बँका मासिक व २८९ बँका त्रैमासिक प्रगतीचे रिपोर्ट रिझर्व्ह बँकेकडे पाठवीत होत्या. त्यांना कामांत दोष दाखविण्यांत आले, ते दूर करण्यांत वेगवेगळ्या बँकांनीं कमी–अधिक यश मिळविलें.

बँकिंगच्या व्यवहार करण्यासाठीं अहवालाचे वर्षीं एकहि नवा अर्ज आला नाहीं. परंतु तीन बँकांनीं बँकिंग व्यवहार सुरू करण्यासाठीं लायसेन्स मागितले कायदा सुरू झाल्यापासून आतांपर्यंत ३४ लायसेन्स देण्यांत आले आहेत. ४ बिगर-शेड्यूल्ड बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आले.

## आसामच्या मळ्यांतील मजुरांची आर्थिक स्थिति

आसाम राज्य सरकारनें चहाच्या मळ्यांवर काम करणाऱ्या मजुरांच्या कुटुंबांच्या अंदाजपत्रकांसंबंधीं पहाणी चालविली होती. पहाणीचा अहवाल आतां प्रसिद्ध करण्यांत आला आहे. पहाणींत असें आढळून आलें कीं काचार जिल्ह्यांतील ९० टक्के कुटुंबांना आणि आसाम खोऱ्यांतील ८८ टक्के कुटुंबांना कर्ज झालेलें होतें. आसाम खोऱ्यांतील कुटुंबांना असणाऱ्या कर्जाची सरासरी ९·३८ रुपये आणि काचार जिल्ह्यांतील कुटुंबांच्या कर्जाची सरासरी ३७·२४ रुपये आहे. आसाममध्यें चहाचे मळे सुमारें १,००० असून त्या सर्वांत मिळून ३,८५,५०० एकर जमिनींत चहाची लागवड करण्यांत आली होती. हे आंकडे १९५१ सालचे आहेत. सर्व मळ्यांत मिळून काम करणाऱ्या मजुरांची संख्या ५,३८,००० इतकी होती. चहाचें एकूण उत्पादन ३१·६ कोटी पौंड झालें, व त्यांपैकीं ५४ टक्के चहा परदेशीं निर्यात करण्यांत आला. पहाणींत सर्वसाधारणपणें असें दिसून आलें कीं स्त्री–मजुरांपेक्षा पुरुष–मजुरांची संख्या अधिक होती. कुटुंबांतील माणसांच्या संख्येचें प्रमाण कुटुंबाच्या उत्पन्नांतील वाढीबरोबर वाढत असल्याचें आढळून आलें. आसामच्या खोऱ्यांत प्रत्येक कुटुंबांत सरासरी ३·८६ माणसें होतीं व त्यांपैकीं २·१२ माणसें चहाच्या मळ्यांत काम करणारीं होतीं. काचार जिल्ह्यांत हेंच प्रमाण अनुक्रमें ४·३४ आणि १·९४ असें होतें. मजुरांच्या एकूण संख्येपैकीं ५१ टक्के मजूर पुरुष होते, ३७ टक्के मजूर स्त्रिया होत्या व १२ टक्के मुलें होतीं. आसामच्या खोऱ्यांत एका कुटुंबाचें आठवड्याचें सरासरी उत्पन्न १८·१० रुपये होतें. उत्पन्नापैकीं १०·३१ रुपयांचें उत्पन्न रोख होतें आणि ६·९३ रु. वस्तूंच्या स्वरूपांत होतें. काचार जिल्ह्यांत उत्पन्नाचा आंकडा कमी आढळून आला. आसाममधील मजूर कुटुंबाचा आठवड्याचा खर्च १८·०५ रुपये आणि काचार जिल्ह्यांतील कुटुंबाचा आठवड्याचा खर्च १६·३९ रुपये आढळून आला.

## वसूल भांडवल आणि रिझर्व्हज ह्यांचें ठेवींशीं प्रमाण (%)

( भारत, ग्रेटब्रिटन आणि अमेरिका येथील व्यापारी बँका )

१९३९–१९५३

| अखेर | भारत (हिंदी बँका) शेड्यूल्ड | बिगर-शेड्यूल्ड | सर्व बँका | ग्रेटब्रिटन ११ क्लिअरिंग बँका | अमेरिका सर्व व्यापारी बँका |
|---|---|---|---|---|---|
| १९३९ | १३ | २५ | १४ | ६ | १४ |
| १९४५ | ६ | ११ | ७ | ३ | ७ |
| १९४९ | ९ | २० | ९ | २ | ८ |
| १९५० | ९ | २१ | ९ | २ | ८ |
| १९५१ | ९ | २२ | १० | २ | ८ |
| १९५२ | ९ | २२ | ११ | २ | ८ |
| १९५३ | ९ | २१ | १० | ३ | ८ |

# BANK OF POONA LIMITED.

*Balance Sheet as at 31st December, 1953.*

## CAPITAL AND LIABILITIES

| | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|
| **1. Capital** | | |
| **Authorised Capital** 50,000 Shares of Rs. 100/-each ... | 50,00,000—0—0 | |
| **Issued Capital** 25,000 Shares of Rs. 100/-each ... | 25,00,000—0—0 | |
| **Subscribed Capital** 25,000 Shares of Rs. 100/-each ... | 25,00,000—0—0 | |
| **Amount Called up at** Rs. 50/-per share. ... | 12,50,000—0—0 | |
| Less calls unpaid ... | Nil | |
| Add forfeited shares. ... | Nil | 12,50,000—0—0 |
| **2. Reserve Fund And Other Reserves** ... | | 19,500—0—0 |
| **3. Deposits And Other Accounts** | | |
| Fixed Deposits ... | 6,21,446-14—0 | |
| Savings Bank Deposits ... | 7,63,198—9—2 | |
| Current Accounts & Contingency Accounts, etc. ... | 7,48,520—8—2 | 21,33,165-15—4 |
| **4 Borrowings from Other Banking Companies, Agents, Etc.** | | |
| (1) In India ... | Nil | |
| (2) Outside India ... | Nil | Nil |
| **Particulars:** | | |
| (1) Secured ... | Nil | |
| (2) Unsecured ... | Nil | Nil |
| **5. Bills Payable:** ... | | 10,734-14—9 |
| **6. Bills For Collection being Bills Receivable as per Contra** | | |
| (1) Payable in India ... | 1,52,209-15—3 | |
| (2) Payable outside India ... | Nil | 1,52,209-15—3 |
| **7. Other Liabilities:** | | |
| (1) Provision for Income-Tax ... | 2,582-10—0 | |
| (2) Branch Adjustments ... | 4,674—8—0 | |
| (3) Outstanding Liabilities for expenses ... | 150—0—0 | |
| (4) Income received in advance ... | 763—0—0 | 8,170—2—0 |
| **8. Acceptances, Endorsements and Other Obligations as per Contra** | | Nil |
| **9. Profit and Loss Account** | | |
| Profit as per last Balance Sheet ... | 18,521—8—9 | |
| Less Appropriations: | | |
| To Reserve Fund 2,500—0—0 | | |
| To Provision for Income-Tax 1,500—0—0 | | |
| To Provision for payment of Bonus to Staff. 2,310—0—0 | | |
| To Investment Fluctuation Fund 3,400—0—0 | 9,710—0—0 | |
| | 8,811—8—9 | |
| Less amount transferred to provision for Bad & Doubtful Debts ... | 8,811—8—9 | |
| | Nil | |
| Add Profit for the year brought from the Profit and Loss Account. ... | 1,215-13—4 | 1,215-13—4 |
| **10. Contingent Liabilities** Nil | | |
| | Total Rs. ... | 35,74,996-12—8 |

# BANK OF POONA LIMITED.

***Balance Sheet as at 31st December 1953***

## PROPERTY AND ASSETS

| | | Rs. As. Ps. | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| **1. Cash** | | | |
| In hand and with Reserve Bank and Imperial Bank ( including Foreign Currency Notes ) ... | | | 4,88,533—1—9 |
| **2. Balances with Other Banks ( on current account )** | | | |
| (1) In India ... | | 3,06,427—3—6 | |
| (2) Outside India ... | | Nil | 3,06,427—3—6 |
| **3. Money At Call And Short Notice** ... | | | Nil |
| **4. Investments** ( of book value ) | | | |
| (1) Securities of the Central and State Governments and other Trustee Securities including Treasury Bills of the Central and State Governments ( Market Value Rs. 5,44,366—6—0 ). ... | | 5,85,202—4—0 | |
| (2) Shares : | | | |
| Ordinary fully paid ... | | 5,911—8—6 | |
| Ordinary partly paid ... | | Nil | |
| Deferred fully paid ... | | Nil | |
| ( Market value Rs. 3,872-12—6 ) | | | |
| (3) Debentures or Bonds ... | | Nil | |
| (4) Other Investments ... | | Nil | |
| (5) Gold ... | | Nil | 5,91,118-12—6 |
| (Govt. Securities of the face value of Rs. 5,50,000/- are lodged with other Banks for advance facilities ) | | | |
| **5. Advances** | | | |
| ( Other than bad and Doubtful Debts for which provision has been made to the satisfaction of the Auditors ). | | | |
| (1) Loans, Cash Credits, Overdrafts, etc. | | | |
| (1) In India | 19,55,968—6—5 | | |
| (2) Outside India | nil | 19,55,968—6—5 | |
| (2) Bills Discounted and Purchased ( excluding Treasury Bills of the Central & State Governments). | | | |
| (1) Payable in India | 5,863-10—0 | | |
| (2) Payable outside India. | nil | 5,863-10—0 | 19,61,832—0—5 |
| **Particulars Of Advances** ( *See Page 204* ) | | | |
| **6. Bills Receivable, Being Bills for Collection as per Contra** | | | |
| (1) Payable in India ... | | 1,52,209-15—3 | |
| (2) Payable outside India ... | | Nil | 1,52,209-15—3 |
| **7. Constituents' Liabilities for Acceptances, Endrosements and Other Obligations as per Contra** ... | | | Nil |
| **8. Premises Less Depreciation** ... | | | Nil |
| **9. Furniture and Fixtures Less Depreciation** | | | |
| At cost as per last Balance Sheet ... | | 47,819—6—9 | |
| Additions during the year ... | | 692-10—0 | |
| | | 48,512—0—9 | |
| Less Depreciation upto 31-12-52 | Rs. 11,759—6—9 | | |
| For the year | 2,236-10—0 | 13,996—0—9 | 34,516—0—0 |
| **10. Other Assets Including Silver** | | | |
| (1) Land at cost ... | | 19,000—0—0 | |
| (2) Vehicles at cost | 11,854—8—0 | | |
| less depreciation upto 31-12-53 | 6,094—8—0 | 5,760—0—0 | |
| (3) Stationery stock ... | | 2,580—0—0 | |
| (4) Stamps ... | | 284-12—3 | |
| (5) Interest accrued on investments ... | | 5,675—5—0 | |
| (6) Tax deducted at source ... | | 4,210—0—0 | |
| (7) Tax paid in advance ... | | 1,950—0—0 | |
| (8) Prepaid expenses ... | | 358-14—0 | |
| (9) Renters locks ... | | 56-12—0 | |
| (10) Income due but not received ... | | 489—0—0 | 40,364-11—3 |
| **11. Non Banking Assets Acquired in Satisfaction of Claims** ... | | | Nil |
| | | Total Rs. ... | 35,74,996-12—8 |

# BANK OF POONA LIMITED.

**Particulars of Advances Referred to on the assets side of the Balance Sheet as at 31-12-1953 on page 203**

| Particulars of Advances :— | Rs. As. Ps. |
|---|---|
| ( 1 ) Debts considered good in respect of which the Banking Company is fully secured | 12,18,067—9—2 |
| ( 2 ) Debts considered good for which the Banking Company holds no other security than the debtors' personal security ... | 6,85,210—4—7 |
| ( 3 ) Debts considered good secured by the personal liabilities of one or more parties, in addition to the personal security of the Debtors. ... | Nil |
| ( 4 ) Debts considered doubtful or bad, not provided for. ... | 58,554—2—8 |
| | 19,61,832—0—5 |
| ( 5 ) Debts due by Directors or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other person. ... | 3,50,296—3—6 |
| ( 6 ) Debts due by companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents, or in the case of private companies as members. ... | 2,46,962-10—4 |
| ( 7 ) Maximum total amount of advance, including temporary advance, made at any time during the year to Directors or Managers or Officers of the Banking Company or any of them either severally or jointly with any other persons. ... | 3,50,296—3—6 |
| ( 8 ) Maximum total amount of advances including temporary advances granted during the year to the companies or firms in which the Directors of the Banking Company are interested as Directors, Partners or Managing Agents or in the case of private companies as members. ... | 3,94,860—9—1 |
| ( 9 ) Due from Banking Companies. ... | Nil |

## *Profit and Loss Account for the Year ended 31st December, 1953*

| EXPENDITURE | Rs. As. Ps. | INCOME : ( Less provision made during the year for bad and doubtful debts & other-usual or necessary provisions ). | Rs. As. Ps. |
|---|---|---|---|
| Interest paid on Deposits, borrowings, etc. | 44,396-13—3 | Interesest and Discount. ... | 1,20,338-11-7 |
| Salaries and Allowances and Provident Fund. ... (1) Manager 7,420—0—0 (2) Staff 39,062—2—6 | 46,482—2—6 | Commission, Exchange and Brokerage. ... | 6,131-10-10 |
| Directors' & Local Committee Members' fees and allowances. ... | 2,150—0—0 | Rents. ... | Nil |
| Rent,Taxes,Insurance,Lighting,etc. | 8,110-15—3 | Net Profit on sale of Investments, gold and silver, land, premises and other assets. (not credited to reserves or any particular fund or account) | Nil |
| Law Charges. 13,532-11—9 Less Recovered 11,904—8—0 | 1,628—3—9 | | |
| Postage, Telegrams and Stamps... | 3,489—6—6 | Net profit on revaluation of investments, gold and silver, land, premises and other assets ( Not credited to Reserves or any particular fund or account. ) ... | Nil |
| Auditors' Fees. ... | 1,000—0—0 | | |
| Depreciation on and repairs to the Banking Company's property... | 3,691-11—9 | | |
| Stationery, Printing, Advertisement, etc. ... | 8,731—2—3 | Income from Non-Banking assets and Profit from sale of or dealing with such assets. ... | Nil |
| Loss from sale of or dealing with non-Banking assets. ... | Nil | | |
| Other Expenditure : ... ( Motor Car Running and Maintenance, travelling and other miscellaneous expenses ) | 9,171-14—9 | Other Receipts. Share Transfer Fee, locker rent and other miscellaneous receipts. ... | 3,597-12-11 |
| Balance of Profit ( Subject to Taxation ) ... | 1,215-13—4 | | |
| Total Rs. ... | 130,068—3—4 | Total Rs. ... | 1,30,068—3—4 |

D. R. Naik,
N. B. Parulekar,
F. P. Pocha,
G. K. Naik, } *Directors.*

M. C. Loya, *Chairman.*   K. D. Joglekar, *Accountant.*   G. G. Sathe, *Manager.*

### REPORT OF THE AUDITORS TO THE SHARE-HOLDERS

We have audited the above Balance Sheet of Bank of Poona Ltd., as at 31st December, 1953, and also the foregoing Profit and Loss Account of the Bank for the year ended upon that date, in which are incorporated the audited returns from Branches and report that :—

(*a*) We have obtained all the information and explanations we have required and have found them to be satisfactory, (*b*) The transactions of the Bank which have come to our notice have been within the powers of the Bank, (*c*) The returns received form the Branch Offices of the Bank have been found adequate for the purpose of the audit, (*d*) In our opinion, the above Balance Sheet and Profit and Loss Account are drawn up in conformity with the Law, (*e*) Such Profit and Loss Account shows a true balance of profit for the year, (*f*) Such Balance Sheet exhibits a true and correct view of the state of affairs of the Bank according to the best of our information and explanations given to us and as shown by the Books of the Bank; and (*g*) In our opinion, Books of Account have been kept by the Bank as required by the Section 130, of the Indian Companies Act 1953.

Poona, 22nd March, 1954.   P. G. Bhagwat, *Chartered Accountants.*

## उत्तर प्रदेशांत कामगारांसाठी घरें

उत्तर प्रदेश सरकारनें कानपुरांतील आणि इतर सहा औद्योगिक शहरांतील कामगारांसाठी चालू वर्षांत आणखी ७,४०० घरें बांधण्याचें ठरविलें आहे. घरांच्या बांधणीची योजना मुक्रर झाली असून बांधकामास ताबडतोब सुरवात होईल. औद्योगिक शहरांतील कामगारांसाठी घरें बांधण्याची जी योजना भारतीय सरकारनें अमलांत आणली आहे. तीप्रमाणें राज्य सरकार घरांचा हा तिसरा गट बांधीत आहे. ह्या योजनेसाठी मध्यवर्ती सरकारकडून आर्थिक मदत मिळत आहे. नवीन घरांपैकी ३,४०० घरें कानपूर शहरांत, १,००० घरें फिरोझाबाद शहरांत, १,२०६ आग्रा शहरांत, ५०० बनारस शहरांत, १०० मिर्झापूर येथें आणि अनुक्रमें ५०० व ६०४ अलाहाबाद व शहराणपूर येथें बांधण्यांत येणार आहेत. भारतीय सरकारच्या घरबांधणी–मदत योजनेप्रमाणें २७७६ घरें बांधण्यांत आलीं असून तीं राहण्यासाठी कामगारांना देण्यांतहि आलीं आहेत. सध्यां कानपूर येथें ३,७५० बिऱ्हाडें बांधण्याचें काम चालू आहे. हें काम सार्वजनिक बांधकाम खातें आणि कानपूर डेव्हलपमेंट बोर्ड ह्यांच्यातर्फे करण्यांत येत आहे. घरें बांधण्याचें काम ८० टक्के पुरें झालेलें असून तीन ते सहा महिन्यांत तीं कामगारांना वसतीसाठी देण्यांत येतील असा अंदाज आहे. चालू बांधकामाशिवाय आणखी एक–दोन कोटी रुपयांच्या योजनेचा विचार सध्यां राज्य सरकार करीत आहे. कानपूरसारख्या गजबजलेल्या शहरांतून कामगारांच्या गलिच्छ वस्त्या बऱ्याच आहेत. पुढील वर्षी त्या उठवून त्यांच्या जागीं नवीन घरांचें बांधकाम चालू करण्यांत येईल असें समजतें. कानपूर शहरांत निदान ५,००० तरी नवीन बिऱ्हाडें बांधण्यांत येतील. कानपूर शिवाय राज्यांतील इतर मोठ्या औद्योगिक शहरांनाहि नव्या घरबांधणींतील कांहीं वांटा योग्य प्रमाणांत मिळणार आहे.

---

**अंदमानची लाकडाची निर्यात—** १९५३–५४ सालीं अंदमान व निकोबार ह्या बेटांनीं भारताच्या निरनिराळ्या भागांना सुमारें २०,००० टन लांकूड निर्यात केलें.

**अमेरिकन मदतीबद्दल इषारा—** मुंबईमधील अमेरिकेचे कॉन्सल जनरल मि. टर्नर ह्यांनीं एका भाषणांत असा इषारा दिला आहे कीं, परदेशांना एकसारखी आर्थिक मदत देणें अमेरिकेला शक्य होणार नाहीं. ह्यापुढें आर्थिक मदतीऐवजीं खाजगी भांडवलाची गुंतवणूक करणें आणि कर्जे देणें ह्या मार्गांचा पुरस्कार करण्याची शिफारस प्रे. ऐसेनहोर ह्यांनीं कॉंग्रेसला केल्याचेंहि त्यांनीं सांगितलें.

**बंगलोरमधील संशोधन संस्था—** बंगलोर येथील इंडिअन डेअरी रिसर्च इन्स्टिटयूट दिल्ली येथें हलविण्यांत येणार आहे असें समजतें. संस्थेसाठी जागा पहाण्याचें काम सध्यां चालू आहे. दुधाच्या व्यवसायासंबंधीं संशोधन करणारी भारतामधील ही पहिली संस्था असून मोठ्या शहरांना दूध पुरविण्याच्या प्रश्नासंबंधीं ती नमुनेदार मानली जाते. संस्थेंत ह्या धंद्याचे तज्ज्ञहि शिक्षण देऊन तयार करण्यांत येतात.

**भारतीय बोटींचे प्रवासी—** १९५३ सालीं भारतामधून ५६,७६२ प्रवाशांनीं बोटींमधून परदेशगमन केलें. त्यांपैकीं जवळ जवळ एक तृतियांश उतारूंनीं भारतीय बनावटीच्या बोटींतून प्रवास केला, असें समजतें.

**भारतामधील काजूचे कारखाने—** भारतांत काजूंचे १९७ कारखाने आहेत. सर्व कारखान्यांत मिळून ५५,००० कामगार कामें करीत असून त्यांपैकीं ७८ टक्के कामगार स्त्रिया आहेत.

## बँक तंट्यासाठी आणखी एक ट्रायब्यूनल ?

बँक ॲवार्डसंबंधींचा तंटा पुनः नव्या ट्रायब्यूनलकडे निवाड्यासाठी जाण्याचा रंग दिसत आहे. लेबर अपेलेट ट्रायब्यूनलच्या निवाड्याच्या अंमलबजावणीस प्रारंभ केलाच पाहिजे; तो निवाडा बदलण्याचा प्रयत्न करण्याची ही वेळ नव्हे, असें नोकरवर्गाच्या पुढाऱ्यांचें म्हणणें आहे. ह्याउलट, बँकर्सच्या मतें, ॲवार्डमुळें लहान बँकांना झळ लागेल व लहान गांवांतून बँकिंगचा प्रसार होऊं शकणार नाहीं. तथापि, नव्या एका ट्रायब्यूनलकडे सर्व प्रकरण सोपविण्यास दोन्ही पक्ष तयार होतील असें समजतें.

---

## प्राणलाल, ६१ वर्षांचे

शेठ प्राणलाल देवकरण नानजी ह्यांचा ६१ वा वाढदिवस गेल्या आठवड्यांत साजरा झाला. ९ जून रोजीं त्यांना ६१ वें वर्ष लागलें. वयाच्या १८ व्या वर्षी त्यांनीं आपल्या वडिलांच्या फर्ममध्यें प्रवेश केला. इंडियन मर्चंटस चेंबरच्या अध्यक्षपदीं त्यांची दोनदा निवड झाली होती. देवकरण नानजी बँकेचे ते चेअरमन व आधारस्तंभ आहेत. कितीतरी औद्योगिक व व्यापारी कंपन्यांचे ते डायरेक्टर आहेत. ह्या सर्व व्यापांतून त्यांनीं साहित्याचीहि उत्कृष्ट सेवा बजावली आहे. पुणें येथील बँकिंग असोसिएशनच्या नोव्हेंबर–डिसेंबर १९५२ मधील बँकिंग प्रदर्शनाचे व व्याख्यानमालेचे ते मुख्य पाहुणे होते व त्यांनीं असोसिएशनला २५१ रु. ची देणगी देऊन सक्रिय उत्तेजन दिलें होतें. कितीतरी उपयुक्त कार्यास त्यांनीं मौलिक हातभार लावलेला आहे.

---

## पुरुषोत्तमदासांना ७५ वें वर्ष

श्री. पुरुषोत्तमदास ठाकूरदास ह्यांना ९ जून रोजीं ७५ वर्षे पुरीं झालीं. वयाच्या २१ व्या वर्षी त्यांनीं मेसर्स नारायणदास राजाराम आणि कं. ह्या फर्ममध्यें प्रवेश केला व सात वर्षांनीं ते तिचे ज्येष्ठ भागीदार झाले. भारताच्या आर्थिक व औद्योगिक प्रगतीच्या इतिहासांत त्यांच्या कामगिरीस अत्यंत महत्त्वाचें स्थान आहे, एवढें सांगितलें म्हणजे पुरें. विशेषतः बँकिंग क्षेत्रांतील त्यांचें मार्गदर्शन बँकर्सच्या तरी विशेष परिचयाचें आहे. आपल्या "आठवणी" लिहिण्यांत ते आतां गुंतले आहेत.

---

**गुन्हेगाराच्या पुस्तकाचें चित्रीकरण—** कॅरिल चेसमन नांवाच्या एका अमेरिकन गुन्हेगाराला चोरी व बलात्कार ह्या आरोपाखालीं फांशीची शिक्षा झालेली आहे. त्याला ता. ३० जुलै रोजीं विजेच्या खुर्चीवर बसवून देहांत शासन देण्यांत येणार आहे. त्यानें 'सेल २४५५ डेथ रो' ह्या नांवाचें एक पुस्तक लिहिलें असून त्यावर आधारलेला चित्रपट हॉलिवुड येथें काढण्यांत येणार आहे. चित्रीकरणाच्या हक्कासाठी किती रक्कम देण्यांत येणार आहे तें समजलेलें नाहीं.

---


## Deccan Institute of Commerce

**594, Budhwar Peth, Poona 2.**

Opens for the 1954–55 Session on Monday the 21st June 1954. Students coached up for G. C. D., L. C. C., D. Com., C. A. (First Part), G. D. C. & A., Dip. L. A., C. A. I. I. B.; Shorthand; Typewriting Examinations. Morning and Evening classes. Admission to respective Diploma Courses open to Matriculates, Undergraduates, and Graduates.

"अहाहा काय तो माझा उज्ज्वल भविष्यकाळ – हीं पांच वर्षें मला किती उमेदीचीं वाटतात. या नदीवर प्रचंड पोलाद व कॉंक्रिटची उंच भिंत उभारली जात आहे··· ते धरण बांधीत आहेत त्यानें माझ्या तसेंच पलीकडील सर्व शेतांनाहि पाणी पुरवठा होईल. यापुढें मला पर्जन्यराजाच्या कृपेवर अवलंबून राहावे लागणार नाहीं !"

हे साध्या भोळया शेतकऱ्याच्या तोंडचे उतावळे उद्गार राष्ट्राच्या इच्छेचे प्रतीक आहेत.

भारताच्या या दरिद्री प्रदेशाचे समृद्ध जमिनींत रूपांतर करण्यासाठीं पंचवार्षिक योजना शेतकी सुधारणेकरितां ७९५ कोटी रूपयांची तरतूद करतें आहे. देशाच्या या प्रचंड पुनर्रचनेच्या कामांत जमिनीची मशागत करणाऱ्याचे साहाय्य महत्वाचे ठरेल.

खरोखर, याच माणसांच्या
हातीं भारताचें भवितव्य आहे.

# तें उत्तम पीकाची निपज करतील

भिन्न प्रकारच्या योजना अमलांत आणण्यासाठीं हजारो टन पोलाद उपयोगांत आणले जाईल. आणि म्हणून निरनिराळया महत्वपूर्ण प्रकारांनी पोलाद आपल्या राष्ट्राला व जनतेला उन्नत, बराच आशादायक भविष्यकाळ दाखवील.

**दी टाटा आयर्न अॅण्ड स्टील कंपनी लिमिटेड**



हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें